# ॥ ज्योतिर्मय ॥

Online Journal of Literature.... साहित्याचे विद्यापीठ

❑ पुणे ❑ वर्ष २ रे ❑ अंक ५४ वा ❑ भारतीय सौर दिनांक १४ चैत्र शके १९४८, शनिवार दि.०४ एप्रिल २०२६ ❑ पाने ४ ❑ मूल्य : निशुल्क (खासगी वितरणासाठी)


## विशेष लेख...

## लुकआउट नोटीस म्हणजे काय? हा नोटीस कोण जारी करतो?

– प्रा डॉ सुधीर अग्रवाल

**ज्योतिर्मय साहित्य**

एखाद्या गुन्हेगाराच्या विरोधात लुक आउट नोटीस जारी करण्यात आला आहे, अशी बातमी वाचण्यात येत असते,या पार्श्वभूमीवर लुक आउट नोटीस म्हणजे काय? हा नोटीस कोणाविरुद्ध व कोण जारी करतो,हे समजून घेण्याचा हा प्रयत्न.

लुक आऊट नोटीस हे भारतातील कायद्याची अंमलबजावणी करणाऱ्या संस्थांद्वारे वापरले जाणारे एक कायदेशीर परिपत्रक आहे, जे पाहिजे असलेल्या गुन्हेगाराला किंवा आरोपीला देशातून (विमानतळ किंवा बंदरमार्गे) पळून जाण्यापासून रोखण्यासाठी वापरले जाते. हे गृह मंत्रालयाच्या निर्देशांनुसार जारी केले जाते, जेणेकरून इमिग्रेशन अधिकारी अशा व्यक्तींना सीमेवर पकडू शकतील.

लुक आऊट नोटीस हे भारतातील कायद्याची अंमलबजावणी करणाऱ्या संस्थांद्वारे वापरले जाणारे एक कायदेशीर परिपत्रक आहे, जे पाहिजे असलेल्या गुन्हेगाराला किंवा आरोपीला देशातून (विमानतळ किंवा बंदरमार्गे) पळून जाण्यापासून रोखण्यासाठी वापरले जाते. हे गृह मंत्रालयाच्या निर्देशांनुसार जारी केले जाते, जेणेकरून इमिग्रेशन अधिकारी अशा व्यक्तींना सीमेवर पकडू शकतील.

जेव्हा एखादा गुन्हेगार कायद्याच्या तावडीतून निसटतो, तेव्हा लुकआउट नोटीस जारी केली जाते. लुकआउट नोटीसला लुकआउट सर्क्युलर असेही म्हटले जाते. कायद्याची अंमलबजावणी करणाऱ्या संस्थांकडून ज्या व्यक्तींना अटक करण्याची विनंती केली जाते, त्यांच्याविरुद्ध अनेकदा लुकआउट नोटीस जारी केली जाते. भारतात, गृह मंत्रालयाने जारी केलेल्या काही विशिष्ट मार्गदर्शक तत्त्वांनुसार लुकआउट नोटीस जारी केल्या जातात.गृह मंत्रालयाने अधिकृत केलेला अधिकारी (उपसचिव, सहसचिव किंवा जिल्हा पोलीस अधीक्षक स्तरावरील अधिकारी) हा नोटीस जारी करतात,या नोटीसची वैधता एक पॅरी पर्यंत असते.

सध्या भोंदू बाबा अशोक खरात यांच्या पत्नी विरोधात लुक आउट नोटीस जारी करण्यात आला आहे. पोलिस अशोक खरात यांच्या मालमत्तेची चौकशी करत आहे. शिर्डीत भोंडू अशोक खरात सह पत्नीवर शेतकऱ्यांची फसलुक आणि सावकारीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे या गुन्ह्यानंतर खराची पत्नी कल्पना खरात खरा झाल्या असून शिर्डी पोलिसांकडून आरोपीचा शोध सुरू आहे अशोक खरात आधी परदेशात पळून जाण्याचे तयारीत होता पण पोलिसांनी त्याला लगेच अटक केली. आता पत्नी कल्पना खरात बाहेरच्या देशात पळून जाण्याची भीती पोलिसांना होती त्यामुळे पोलिसांनी लुक आउट नोटीस काढली मागील काही दिवसांपासून कल्पना खरात फारअसून पोलीस शोध घेत आहे.

एकंदरीत, लुकआउट नोटीस हा एक महत्त्वाचा प्रशासकीय उपाय आहे, ज्यामुळे पोलीस आणि इतर तपास यंत्रणांना गुन्हेगारांवर लक्ष ठेवण्यास मदत होते.

अनेकदा गंभीर फौजदारी गुन्हे, आर्थिक गुन्हे, कर्ज थकबाकी किंवा वैवाहिक विवाद (कलम ४९८अ अंतर्गत) यांसारख्या प्रकरणांमध्ये जारी केले जाते. हे पासपोर्ट कायदा, १९६७ अंतर्गत जारी केले जाते.






## रा. स्व. संघाचे कार्य संघबंदी नंतर देशभर व देशाबाहेर विस्तारले-योगेश थत्ते

**ज्योतिर्मय साहित्य**

पुणे – राष्ट्रीय स्वयंसेवक संघावर तत्कालिन केंद्र शासनाने लोकशाहीची तत्वे झुगारून बंदी आणली, लाखो स्वयंसेवकांना तुरुंगात विनाकारण डांबले परंतु त्या काळात व नंतर संघाचे काम विस्तारले गेले. नवनवीन सेवा प्रकल्प सुरू केले गेले. शाखांची संख्या वाढली, हजारो नवतरुण संघ कामात व सेवा प्रकल्पामध्ये जोडले गेले'' असे प्रतिपादन इतिहास प्रबोधन समितीचे प्रदेश संयोजक योगेश थत्ते यांनी केले.

कर्वेनगर माहेश्वरी मंडळ आयोजित सकल हिंदू समाज तर्फे सहवास वस्तीमधील विराट हिंदू मेळाव्यात योगेश थत्ते प्रमुख वक्ते म्हणून बोलत होते ते पुढे म्हणाले, संघ शताब्दी वर्ष साजरे करतांना संघाने हिंदू संघटन बरोबरच शाखा विस्तार तसेच समाजातील सर्व घटकांना बरोबर घेऊन विविध सामाजिक कार्यावर जास्त काम करायचे ठरवले आहे. राष्ट्रीय स्वयंसेवक जनकल्याण समिती द्वारा राज्यामध्ये समाजातील अनेक वंचित नागरिकांसाठी सेवा प्रकल्प चालवित आहे.संघाच्या विविध क्षेत्रात जसे विश्व हिंदू परिषद, विद्यार्थी परिषद, भारतीय मजदूर संघ,राष्ट्रीय सेविका समीर, वनवासी कल्याण आश्रम, विश्व विभाग,पूर्वांचल विकास, सामाजिक समरसता मंच, गो-सेवा प्रकल्प, ग्रामविकास प्रकल्प,अखिल भारतीय पूर्व सैनिक परिषद, अधिवक्ता परिषद, भारत विकास परिषद, क्रीडा भारती,विद्या भारती,सेवा भारती,संस्कार भारती, उद्योजक भारती, संस्कृत भारती, सेवा सहयोग,भारत विकास परिषद, दिव्यांगासाठी काम करणारी सक्षम, सेवा आरोग्य फाऊंडेशन, स्वदेशी जागरण मंच,दुर्गा वाहिनी अशा विविध संस्था व संघटनाद्वारे अनेक क्षेत्रात कार्यरत असून या शताब्दी वर्षात अधिकाधिक सामाजिक कार्य करण्याचे ठरविले आहे''

मातृशक्ती वक्त्या व ''विश्वमांगल्य छात्र सभा''च्या प्रा माधवी शिंदे पंचपरिवर्तन द्वारे समाज सुदृढ, सुसंकृत व सुसंघटित व्हावा म्हणून सर्वांनी प्रयत्न केले पाहिजे. कुटुंब प्रबोधन विषयाला अनुसरून त्यांनी कुटुंबियातील एकमेकांशी असलेला संवाद वाढायला हवा'' असे प्रतिपादन करून पुढे म्हणाल्या देशाचे भवितव्य तरुण पिढीकडे असल्याने त्यांनी करिअर व पैसे कमविणे या पलीकडे जाऊन पितृऋण, मातृऋण, समाजऋण,



राष्ट्रप्रेम याकडे अधिक लक्ष देण्याची गरज

आहे.बदलत्या काळासोबत माणसाचे राहणीमान आणि विचारसरणी बदलली असली तरी कुटुंब ही संकल्पना आजही आपल्या जगण्याचा कणा आहे. कौटुंबिक नाते संबंध जपले पाहिजे. कुटुंबातील तरुण मुला मुलींना योग्य दिशा दाखवणे व त्यांना सुरक्षितता देणे हे घरातील ज्येष्ठांचे कर्तव्य असल्याचेही या वेळी त्यांनी सांगितले. कुटुंबातील लोकांनी त्यांच्याशी संवाद साधून त्यांच्या मनात काय चालले आहे हे ओळखण्याचा प्रयत्न करावा''


तुफान पर्जन्यवृष्टीमुळे सहवास वस्तीतील हे हिंदू संमेलन मनमोहन सोसायटीच्या मैदानाऐवजी सभागृहात घेण्यात आले.


कार्यक्रमाच्या सुरवातीस आकांक्षा देशपांडे ह्यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला.व कार्यक्रमाचे सूत्र संचालन केले.डॉ चेतन होशिंग यांनी ''अफझलखानाचा वध'' यावर अतिशय सुंदर पोवाडा सादर केला.

प्रा माधवी शिंदे यांचा सत्कार शुभांगी सुदामे यांनी तर योगेश थत्ते व डॉ चेतन होशिंग यांचा सत्कार मनमोहन सोसायटी चे अध्यक्ष संजीव महाजन यांनी केला. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे संभाजीभाग सहकार्यवाह अमोल जोशी यांनी संस्थेचे अध्यक्ष संजीव महाजन यांचा सत्कार केला. यावेळी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे कर्वेनगर संघचालक उदयन पाठक यांची मुख्य उपस्थिती होती. विजय मोने यांनी पसायदान गायिले. उत्कर्ष प्रकाशनचे उल्हास जोशी यांनी माधवी शिंदे यांना रवींद्र काळे अनुवादित ''आधुनिक हिंदू धर्म का व कसा'' हे पुस्तक भेट दिले. उल्हास जोशी यांचा सत्कार योगेश थत्ते यांचे हस्ते करण्यात आला तर प्रा. माधवी शिंदे यांच्या हस्ते सूत्र संचालन करणाऱ्या आकांक्षा देशपांडे ह्यांचाही याप्रसंगी सत्कार करण्यात आला. कार्यक्रमास पद्मरेखा, मनमोहन सोसायटी, सहवास सोसायटी, भुजबळ परिसर, पाश्चिमा नगरी, रेवती, मेघराज, लक्ष्मीप्रसाद, आसावरी, विभावरी, विद्यापीठ सोसायटी, दामोदर अपार्टमेंट, आनंदनिकेतन, चिंतामणी, क्षिप्रा सोसायटी, के- ५२, कृष्णाई कॉम्प्लेक्स, गीतगंगा, तसेच कर्वेनगर भागातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## शिव आणि नाग यांचे गहन रहस्य

**ज्योतिर्मय साहित्य**






१: कैवल्योपनिषद हे अत्यंत छोटे पण अतिशय अर्थपूर्ण उपनिषद आहे. यात शिवाच्या सगुण आणि निर्गुण रूपाचे सुंदर वर्णन आले आहे. तुम्ही विचारल्याप्रमाणे, भगवान शिवाच्या ध्यानाशी संबंधित एक महत्त्वाचा श्लोक खालीलप्रमाणे आहे:

मूळ संस्कृत श्लोक (श्लोक ७):

उमासहायं परमेश्वरं प्रभुं
त्रिलोचनं नीलकण्ठं प्रशान्तम् ।
ध्यात्वा मुनिर्गच्छति भूतयोनिं
समस्तसाक्षिं तमसः परस्तात् ।। ७ ।।

मराठी अर्थ : ''उमा (शक्ती) ज्यांच्या सहाय्यक आहेत, जे परमेश्वर आणि सर्वशक्तिमान प्रभू आहेत, ज्यांना तीन डोळे आहेत आणि ज्यांचा कंठ निळा (नीलकंठ) आहे; अशा अत्यंत शांत स्वरूपाच्या शिवाचे ध्यान करून मुनी (साधक) सर्व भूतांचे कारण असलेल्या, सर्वांचे साक्षी असणाऱ्या आणि अज्ञानाच्या (अंधकाराच्या) पलीकडे असलेल्या परम तत्त्वाप्रत पोहोचतात.''

या श्लोकाचे काही महत्त्वाचे पैलू:

उमासहायं : येथे शिव आणि शक्तीचे अद्वैत नाते सांगितले आहे. ब्रह्मविद्या म्हणजेच उमा, जी शिवाला प्राप्त करून देण्यास साहाय्य करते.

नीलकण्ठः हा संदर्भ तुम्ही आधी उल्लेख केलेल्या नाग आणि विष या विषयाशी निगडित आहे. विश्वातील विष (दु:ख/नकारात्मकता) कंठात धारण करून जगाला अभय देणारे ते नीलकंठ आहेत.

तमसः परस्तात: शिव हे केवळ सृष्टीचे रक्षक नसून ते अज्ञानाच्या (तमाच्या) पलीकडे असलेले शुद्ध ज्ञानस्वरूप आहेत.

हे उपनिषद सांगते की, अशा प्रकारे शिवाचे ध्यान केल्याने साधक जन्म-मरणाच्या फेऱ्यातून मुक्त होऊन कैवल्य पद प्राप्त करतो.

शिव आणि त्याग

या उपनिषदात शिवाच्या स्वरूपाचे वर्णन करताना त्यांना नीलकंठ आणि प्रशांत म्हटले आहे. यात सांगितले आहे की, जो सर्व आसक्तींचा (भयाचा) त्याग करून ध्यान करतो, तोच त्या परम तत्वाला प्राप्त करतो. सर्प हा मृत्यू आणि कालचक्राचे प्रतीक आहे, ज्याला शिवाने आपल्या गळ्यात स्थान दिले आहे, म्हणजेच त्यांनी काळावर विजय मिळवला आहे.

२. योगकुंडल्युपनिषद (कुण्डलिनी शक्ती)

नाग हे कुण्डलिनी शक्तीचे सर्वात मोठे प्रतीक आहे. या उपनिषदात स्पष्टपणे कुण्डलिनीचा उल्लेख सर्पाकार असा केला आहे:

''कुण्डलिनी कुटिलाकारा सर्पवत परिकीर्तिता।''

अर्थात, कुण्डलिनी ही सर्पाप्रमाणे साडेतीन वेढे घालून सुप्त अवस्थेत असते. जेव्हा योगी प्राणायामाद्वारे ही शक्ती जागृत करतो, तेव्हा तो संसाराच्या बंधनातून मुक्त होतो.

३. श्वेताश्वतरोपनिषद (प्रकृति आणि परमेश्वर)

या उपनिषदात शिवाला (रुद्राला) विश्वाचा अधिपती मानले आहे. यात नाग हे प्रकृतीचे आणि तामस गुणांचे प्रतीक मानले जातात. शिव त्यांना धारण करतात, याचा अर्थ ते प्रकृतीच्या सर्व गुणांच्या पलीकडे (गुणातीत) आहेत आणि विश्वातील विषारी किंवा घातक शक्तींनाही त्यांनी आपल्या नियंत्रणात ठेवले आहे.

४. अमृतबिंदूपनिषद (मन आणि मोक्ष)

येथे मनाची तुलना सर्पाशी केली जाऊ शकते, जे चंचल आणि विषारी (विकारांनी भरलेले) असते. जेव्हा हे मन शिवात विलीन होते, तेव्हा ते आभूषण बनते. उपनिषद सांगते की, मन एव मनुष्याणां कारणं बंधमोक्षयो: म्हणजेच मनच बंधनाला आणि मोक्षाला कारणीभूत आहे. सर्पाला वश करणे म्हणजे मनाला वश करणे होय.

थोडक्यात सांगायचे तर:

नाग हा काल (वेळ) आणि विष (सांसारिक दु:ख) यांचे प्रतीक आहे. शिवाने त्याला गळ्यात धारण करणे हे दर्शवते की ते काळाच्या पलीकडे (महाकाल) आहेत आणि जगाचे दु:ख (हलाहल) पचवण्याची क्षमता केवळ त्यांच्यातच आहे.


भगवान शिवाच्या गळ्यात गुंडाळलेला नाग हा केवळ एक अलंकार नसून, तो भय, मृत्यू आणि निसर्गाच्या मूळ शक्तींवरील त्यांच्या पूर्ण नियंत्रणाचे प्रतीक आहे. जग ज्या नागाकडे भीती आणि संकटाच्या रूपात पाहते, त्याला शिव अतिशय सहजपणे धारण करतात हीच त्यांची दिव्यता आहे.

नाग हा कुंडलिनी शक्तीचे देखील प्रतीक आहे, जी प्रत्येक मानवाच्या शरीरात सुप्त अवस्थेत असते. जेव्हा ही शक्ती जागृत होते, तेव्हा व्यक्तीची आध्यात्मिक प्रगती होते आणि त्याला जीवनाचे वास्तविक सत्य उमजते.

शिव आपल्याला शिकवतात की, जो मनुष्य आपल्या भयावर विजय मिळवतो आणि आपल्या आंतरिक शक्तीला ओळखतो, तोच खऱ्या अर्थाने जीवन आणि मृत्यूच्या बंधनातून मुक्त होतो.

भयावर विजय मिळवणे हेच शिवत्वाकडे जाणारे पहिले पाऊल आहे.

जागृत चेतना हीच खरी शक्ती आहे. भगवंत हृदयस्थ आहे

जाहिरात व्यवस्थापक, ज्योतिर्मय साहित्य, पुणे




# जात्यावरच्या ओव्या......

झाली भेसळ खर्याची
खोट बिनबोभाट
खर पडल सांदीला
खोट्या बसायला पाट ||५७६||

खर सांगत सुटला
तोच डोळ्यात खुपला
बोल बोलताच खरे
तोच पह्यले संपला ||५७७||

©® सौ. मनोरमा बोराडे
छत्रपती संभाजी नगर
मो. 70207 33758

# मनोपनिषद अर्थात मनाचे श्लोक-भाग १४




विश्वास देशपांडे
चाळीसगाव
मो.९४०३७४९३९२

ज्योतिर्मय साहित्य

जन्म आणि मृत्यू या जणू एका नाण्याच्या दोन बाजू आहेत. जीवनाला कंटाळलेले वृद्ध किंवा असाध्य रोगांनी त्रस्त झालेले काही जण मृत्यूला वरदान मानतात. भगवद्गीतेत सांगितल्याप्रमाणे मनुष्य जुने झालेले वस्त्र टाकून देऊन नवीन वस्त्र धारण करतो; त्याप्रमाणे आत्मा जर्जर देह सोडून नवीन शरीर धारण करतो. त्यामुळे मृत्यू हा अंत नसून नव्या प्रवासाची सुरुवात आहे असेही म्हणता येईल.

तरीसुद्धा माणसाच्या मनात मृत्यूचे भय असते. कारण देहाशी असलेली आसक्ती फार प्रबळ असते. परंतु काळापुढे सर्व समान असतात. लहान-थोर, स्त्री-पुरुष, राजा-रंक असा कोणताही भेद काळ करत नाही. म्हणूनच समर्थ ''परी शेवटीं काळमुखीं निमाला'' असे अत्यंत नेमके शब्द वापरतात.



राम, कृष्ण किंवा संत ज्ञानेश्वर यांसारख्या महान विभूतींनी आपले अवतारकार्य पूर्ण करून देह ठेवला. त्यांच्यासारख्या महापुरुषांचेही जीवन मर्यादित होते. मग सामान्य माणसांचे जीवन किती क्षणभंगुर आहे याची जाणीव आपण ठेवली पाहिजे.

आपल्याला हा जन्म पूर्वसंचितानुसार मिळतो. आपल्या मनातील वासना पूर्ण करण्यासाठी आणि कर्मफळे भोगण्यासाठी आपण जन्म घेतो असे सांगितले जाते. चांगल्या कर्मांचे चांगले फळ मिळते, तर वाईट कर्मांचे दुष्परिणाम भोगावे लागतात. भोग संपेपर्यंत जीवनयात्रा सुरूच राहते.

म्हणूनच समर्थ आपल्याला सूचित करतात की या दुर्लभ मनुष्यजन्माचे महत्त्व ओळखावे. प्रपंच करत असतानाही परमार्थाचा मार्ग धरावा. जीवनाचा उपयोग सत्कर्मांसाठी आणि आत्मोन्नतीसाठी करावा.


स्वसंवाद : माझ्या जीवनाचे अंतिम ध्येय काय आहे याचा मी कधी गंभीरपणे विचार केला आहे का?

मृत्यू अटळ आहे ही जाणीव ठेवून मी माझे वर्तमान अधिक अर्थपूर्ण जगतो का?

हा दुर्लभ मनुष्यजन्म मला काही चांगले करण्यासाठी मिळाला आहे का, याचा मी कधी विचार करतो का?

प्रपंच करत असतानाही परमार्थ साधण्यासाठी मी काही प्रयत्न करतो आहे का?

(क्रमशः)






## दासबोध स्तवन



उज्वला धर्माधिकारी,
पुणे, मो. ७५८८२ ३५६४६

# देहान्त निरूपण

ज्योतिर्मय साहित्य

आत्मरूपाशी तदाकार झाल्याने तिकडे त्याला परमात्म भाव दिसु लागतो. सगळी माया ही त्याच्या पर्यन्त पोहचलेली असते.

ब्रम्हादिकांसारख्यांना त्याच्या स्वरूपाचा अंदाज येत नाही.

देहबुद्धी मेल्याने ते जिवंत असुन मेल्यासारखा रहातो.

मी आत्माचं आहे या स्वच्छ विवेकाच्या जोरावर जन्ममृत्युचा आनंद किंवा दुःख हे दोन्ही त्यांच्या जवळ रहात नाहीत. त्यांचे जीवन सामान्य माणसासारखे असते. तो सर्व सामान्य माणसाला जे जे गरजेचे आहेत ते ते सारे जगरहाटी नुसार करतो. पण त्यांच्या एकंदरीत वागण्या बोलण्यातून वेगळेपण अनुभवास येते. त्यांचे वेगळेपण अधोरेखित होते.


तो शुध्द, निर्मळ, आत्मस्वरूप असल्याने देहा विषयी आवश्यक असलेले अशाश्वत, अशुध्द, मलिन, दृष्य पदार्थ त्याला स्पर्श करू शकत नाहीत.

अशा रितीने मी देह आहे हे मान्य करून देहाच्या भवती असलेले असण्याचे वलय ज्याला समजते ते ते साधुसंत व त्यांच्या सहवासात असलेले सर्वसामान्य माणूस पवित्र होऊन जातात व स्वता:चा उध्दार करून घेतात.

सद्गुरूंची संगत व सत्पुरूषां ची संगत दोन्ही एकचं आहे. ज्याला आत्मज्ञान हवे आहे त्याने साधक बनणे योग्य आहे. साधकाने सद्गुरूना शरण जावे.परमार्थ नीट समजून घ्यायला हवा. श्रवण,मनन करावे. स्वतः समजून घेत उद्धार करावा.

***

# नामाचा अनुभव



श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज

ज्योतिर्मय साहित्य

नामाचा अनुभव कोणता ? नामाचा अनुभव नामाव्यतिरिक्त दुसऱ्या कशात पाहू नये; म्हणजे, नामापासून दुसरे काही मिळवायचे आहे ही कल्पनाच नसावी. नाम मुखी येते हाच नामाचा अनुभव. ज्या प्रमाणात आपल्या हातून नामस्मरण घडले त्या प्रमाणात आपल्याला नामाचा अनुभव आला असे समजावे. अखंड नामस्मरण टिकले, की पुरा अनुभव आला. नामस्मरण करता करता चित्त एकाग्र होते. देहबुद्धी विसरून नाम घेणे हेच निर्गुण होणे आहे. मी कोण आहे हे कसे ओळखावे ? ' मी कोण आहे ' हे ओळखायला, जडाने म्हणजे वाचेनेच नाम घेण्यास सुरुवात करावी, आणि ते नाम अखंड घेण्याचा प्रयत्न करावा. मग ते मनाने आतल्याआत होऊ लागते. पहिल्यानेच आपल्या प्रयत्नाने मनाला नामाचे वळण लावण्याच्या नादी लागू नये, कारण ते फारच अवघड आहे. नाम घेता घेता देहाचा विसर पडल्यावर मी कोण आणि देव कोण हे आपोआप कळेल.

भगवंताच्या नामाचा नाद लागला तर दु:खाची जाणीव कमी होते. दु:खाची जाणीव नसल्यावर दु:ख असले म्हणून बिघडले कुठे ? काळोख्या रात्री जशी काठी आधार असते, तसे संसारात नाम आहे. खाचखळगे काठीच्या योगाने टाळता येतात, तसे मोह, लोभ इत्यादि संसारातल्या अडचणी नामाने समजतात आणि दूर करता येतात. विस्तवाजवळ तूप ठेवले की ते वितळते, तसे नामाची शेगडी ठेवली की अभिमान वितळलाच पाहिजे. हाच नामाचा अनुभव. पण लोक नामाबद्दल ऐकूनच घेत नाहीत; जर कोणी ऐकून घेतले तर ते बिंबवून घेत नाहीत, त्याचे मनन करीत नाहीत; आणि मनन करून ज्यांना ते पटले, ते पटले असूनही नाम घेत नाहीत. अडचणी असल्या तरी नाम घेता येते. म्हणून नामस्मरण न करण्याबद्दल सबबी सांगू नका. सबब सांगितली की त्यापासून लबाडी उत्पन्न होते, लबाडीतून आळस उत्पन्न होतो, आणि आळसाने सर्वनाश होतो. आपण रोज उठल्यावर भगवंताचे स्मरण करण्याचा नियम ठेवावा. स्नान वगैरे गोष्टी झाल्या तर कराव्याच, पण त्यांच्यावाचून अडून बसू नये. भगवंताचे स्मरण हे मुख्य आहे. अखंड नामस्मरण ठेवायला सोवळ्याओवळ्याचे बंधन नाही. अखंड स्मरणच सोवळे आहे.

उपासना कोणतीही असली तरी नामाशिवाय ती पचनी पडत नाही. महत्त्व नामाला आहे. निरनिराळ्या देशांतले अन्न निरनिराळे असू शकते, पण ते पचविण्याकरिता लागणारे पाणी इथून तिथून सर्व सारखेच. पाण्याशिवाय कोणतेही अन्न पचणार नाही. त्याप्रमाणे उपासनारूपी अन्नाला पचविण्यासाठी नामरूपी पाण्याची जरुरी आहे. म्हणून नामाला महत्त्व देऊन ते सतत घेण्याचा अभ्यास करावा. कसाही प्रसंग आला तरी नामस्मरण सोडू नका. त्यातून परमात्मा हात देईल.

नाम घ्यायला स्वत:चीच आडकाठी असते. ती दूर केली तर नामाचा अनुभव आल्यावाचून राहणार नाही.

# श्री क्षेत्र नैमिष्यारण्य भागवत कथा व हरिनाम सप्ताह

भागवत कथाकार :
आदरणीय श्री चैतन्य महाराज देगलूरकर
कथेचे श्रवण करताना धावते संकलन
मधुकर बोरीकर 9403061886

पुढे......

भक्तिशास्त्रात विरहाचे 10 प्रकार आहेत. राधेला त्याचा फार त्रास झाला. भगवान येत नाहीत. राधा कृश झाली. ललिता राधेस म्हणाली. काय ही तुझी अवस्था? ललिता म्हणाली मी कृष्णास बोलविते. राधा म्हणे नको जाऊस. ती न ऐकता कृष्णाच्या दरबारात गेली. कृष्णाने ओळखही दाखविली नाही. तिने शेवटी सांगितले, मी ललीता. कृष्ण म्हणे कोण ललिता? ती म्हणाली अरे राधेस तरी ओळखतोस ना ? कृष्ण म्हणाले कोण राधा? ललिता हाकलून देण्यात येते. ती परत आल्यावर राधा ललिताला म्हणाली मी तुला जाऊ नको म्हणाले होते ना. तो कृतघ्न नाही. राधा म्हणाली तो येणार नाही आणि आलाच तरी त्याच्या रुपया इतकीच इतकाच तो मला दिसेल आता मात्र मला तो सर्वत्र पानाफुलात नदी वृक्षात सर्वत्र दिसतो आहे.

युधिष्ठिराला चित्रगुप्त म्हणाले तुमचे पुण्य मोठे व पाप अल्प आहे. तुम्हाला नर्काचे केवळ दर्शन व स्वर्गात स्थान आहे. तुम्ही आधी नर्क दर्शन घेता का शेवटी. युधिष्ठिर आधी दर्शन घेऊ म्हणाला. तिथे कृतघ्न व्यक्तीचे मांस कुत्रे देखील खात नाहीत असे दिसले. माणुस कृतघ्न का नसावा या साठी हे सांगितले.

कृष्ण इथे मुद्दाम येत नाही.

राधा म्हणे मी आता देह ठेवते माझी उत्तरक्रिया ललिता तू कर. राधा म्हणाली तमाल वृक्षाच्या बुंध्याला वेलीने मला करकचून बांध. हे यासाठी की तो नाही तर नाही निदान वृक्षाच्या काळ्या रंगाशी तरी मी एकरूप होईन.

मोठे दुःख पाहिले की आपली दुःखे छोटी भासतात. असे दुःख हलके व्हावे म्हणून कथेत या घटना आहेत. क्रमश:




# तोंड येण्याची कारणे...

ज्योतिर्मय साहित्य

कुपोषण.आहारदोष किंवा चुकीची आहारपद्धती आणि जीवनशैली.जीवनसत्त्व नायसीन,रायबोफ्लॅवीन. फोलेट ॲसिड, जीवनसत्त्व सायनोक्लोमाइनच्या कमतरता. दात, जीभ, हिरडया आणि तोंडाची पुरेशी स्वच्छता नसणे.दीर्घकाळ अँटिबायोटिक औषधाचे सेवन करणे.कॅन्सरच्या औषधाचा दुष्परिणाम होणे.तंबाखू दारू, गुटखा याचं सेवन करणे.मानसिक ताणतणाव.अपुरी झोप.अति मसालेदार, तिखट अन्नपदार्थाचं सेवन करणे.कमी प्रतिकारशक्ती. जीवनसत्त्वांची कमतरता.

वारंवार टुथपेस्ट बदलणे.कधी कधी काही स्त्रियांना मासिक पाळीपूर्वीदेखील तोंड येतं. पण ते मर्यादित काळासाठी असतं.

तोंड येणं म्हणजे नेमकं काय होतं...?

तोंड येतं तेव्हा जीभ, गालाचा आतील भाग, टाळू, हिरडया, जिभेच्या कडा, ओठाची आतली बाजू पूर्णत: लाल होते. काही वेळेला पांढरट, पिवळसर गोल जखमा तयार होतात. इतकंच नाही तर कधी कधी घशाच्या आत किंवा जिभेवर पांढरट थर जमा होतो. अशा वेळी तोंडातून गरम वाफा निघाल्याचं जाणवतं. जिभेच्या कडा खडबडीत होतात. तिथेही फोड येतात. कधी कधी ताप येतो किंवा अंगात कणकण जाणवते.

पचनसंस्थेवर ताण पडून शौचाच्या तक्रारीही निर्माण होतात. त्याचबरोबर भूक मंदावणे, प्रतिकार शक्ती कमी होणे, इतर आजरांना सामोरे जावे लागतं. यासारख्या तक्रारी वारंवार तोंड येण्याने दिसून येतात. वारंवार तोंड आल्यामुळे अपचन, जुलाब, मोठया आतडयाचे विकार, मानसिक ताणतणाव अशा प्रकारांना सामोरं जावं लागतं.

थोडक्यात शरीरातील ब गटातील जीवनसत्त्वांचं प्रमाण कमी झालं की त्याचा मज्जा पेशींवर परिणाम होतो. त्वचा, ओठ, गालाचा आतील भाग, जीभ आणि घसा तसेच पचनसंस्थेतील महत्त्वाचे पाचकरस करणा-या ग्रंथी, तसेच रक्त तयार करणा-या ग्रंथींचं कार्य जीवनसत्त्व बी गटामुळे होत असतं. मात्र या जीवनसत्त्वांच्या अभावाने त्यांचं कार्य बिघडतं त्यामुळे तोंड येतं.

तोंड येऊ नये म्हणून काय कराल...?तोंडाची आंतरबाह्य स्वच्छता.

संकलन –
डॉ. प्रमोद ढेरे (निसर्ग उपचार तज्ञ)
पिंपरी-चिंचवड, पुणे.
आरोग्यविषयक व्याख्याते व लेखक
संपर्क – ९२ ७१ ६६९ ६६९

पान, तंबाखू, गुटखा यांसारख्या घातक घोष्टींचं सेवन पूर्णपणे बंद करावं.आहारात जीवनसत्त्व आणि चोथायुक्त पदार्थाचा समावेश करावा.भरपूर पाणी प्यावं. दिवसभरातून किमान आठ ते दहा ग्लास पाणी पिणं आवश्यक आहे.पुरेशी झोपही आवश्यक आहे. रात्रीच्या जागरणाने शरीरात उष्णता वाढते. त्यामुळेही तोंड येतं.किमान सहा ते सात तास झोपणं आवश्यक आहे. तणावरहीत जगणं आवश्यक आहे. कोणत्याही गोष्टीचा मनावर ताण आल्याने त्याच्या परिणाम आपल्या प्रकृतीवर होतो. तोंड आलेल्या ठिकाणी ग्लिसरीन लावावं. आणि लाळ थुकून टाकावी. तोंडात कात धरल्यानेही आराम पडतो. मात्र त्वरित आराम न पडल्यास तज्ज्ञांचा सल्ला घ्यावा.

शरीराला आवश्यक जीवनसत्त्व कोणती?

बी १ अर्थात थायमिन, रायबोफ्लेवीन, नायसीन

ही जीवनसत्त्व कोणत्या पदार्थातून मिळतील...?

थायमिन : सर्व प्रकारची तृणधान्य, हातसडीचा तांदूळ, कोंडयासकट गहू, मोड आलेली कडधान्य, ज्वारी आणि बाजरी.

रायबोफ्लेवीन : दूध, तृणधान्य, डाळी यातून अधिक प्रमाणात मिळतं.

गर्भावस्थेतील स्त्रिया, थायरॉईड ग्रंथीचे आजार, संतती नियमनाच्या गोळ्यांचे सेवन करणाऱ्यांना या जीवनसत्त्वाची अधिक गरज असते.

नायसीन : संमिश्र आहार. तृणधान्य आणि दूध.


वारंवार तोंड येत असेल तर त्याची वर नमूद केल्याप्रमाणे बरीच कारणे आहेत.

# आनंदामृत ....

विचारमंथन प्राचीन वाङ्मयाचे...

अपर्णा परांजपे, कात्रज पुणे
मो. 95030 45495





## वेताळ कथा २१ (वेताळ पंचविंशती)

एका तरुणाला आपल्या आयुष्यात कोणता मार्ग निवडायचा हे समजत नव्हते. त्याच्यासमोर अनेक पर्याय होते, पण कोणताही स्पष्ट वाटत नव्हता.

तो अनेक ज्ञानी लोकांकडे गेला. प्रत्येकाने वेगवेगळे सल्ले दिले. तो अधिक गोंधळला. शेवटी तो एकटाच शांत बसला. त्याने स्वत:च्या मनाकडे पाहिले.

त्याला समजले - सर्व उत्तरं बाहेर नाहीत. त्याने एक मार्ग निवडला - पूर्ण खात्री नसतानाही.

काळानुसार त्याला समजले की त्याचा विश्वासच त्याला योग्य दिशेने नेत होता.

वेताळाने विचारले - तो योग्य कधी ठरला?

राजा विक्रम म्हणाला -"जेव्हा त्याने अनिश्चिततेतही विश्वास ठेवला, तेव्हा तो योग्य ठरला."

मनाचा एकविसावा स्तर (गूढ संबंध)

या कथेत "अनिश्चितता आणि विश्वास" यांचा सूक्ष्म संबंध दिसतो.

१: अनिश्चितता : भविष्य अस्पष्ट असते
२: अस्वस्थता : मनाला खात्री हवी असते
३: शोध : उत्तर शोधण्याचा प्रयत्न
४: विश्वास : जीवनावर विश्वास ठेवणे
५: समर्पण : जे आहे त्याला होकार देणे

आत्मचिंतन करु या : मला सर्व काही निश्चित हवे असते का? की मी अनिश्चिततेतही शांत राहू शकते?

दुसरा विचार शाश्वत समाधान देणारा असतो

"अनिश्चिततेतही विश्वास ठेवणे हीच अंतर्मनाची स्थिरता आहे."

भगवंत हृदयस्थ आहे 🙏

# ''तरी असेल गीत हे'' सौ.मृदुला दाढे यांच्या सुश्राव्य गीतांचा कार्यक्रम

**ज्योतिर्मय साहित्य**

पुणे - भारतीय मजदूर संघाशी संलग्न असलेल्या बँक ऑफ महाराष्ट्र रिटायर्ड एम्प्लॉईज ऑर्गनायझेशनच्या महिला विभागातर्फे पुण्यात डॉ मृदुला दाढे यांचा तरी असेल गीत हे हा सुश्राव्य गीतांचा एक अतिशय अविस्मरणीय कार्यक्रम रविवार २९ मार्च रोजी कमिन्स महाविद्यालयातील सभागृहात संपन्न झाला.

बँक ऑफ महाराष्ट्र निवृत्त संघटनेचा महिला विभाग महिला दिनाच्या निमित्ताने महिला सदस्यांसाठी दरवर्षी विविध सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करीत असतात. त्यातला हा एक कार्यक्रम.

कमिन्स कॉलेजच्या सभागृहात झालेल्या या कार्यक्रमात मृदुला दाढे यांनी, दिग्गज संगीतकारांचे समृद्ध संगीत लाभलेल्या जुन्या मराठी-हिंदी गाण्यांतील शब्दांचे भाव - विभ्रम आपल्या गोड गळ्यातून उमटवत सुमारे दोन तास रसिकांना मंत्रमुग्ध केले.

ॐ नमोजी आद्या ह्या संत ज्ञानेश्वरांच्या व पं. हृदयनाथ मंगेशकरांनी संगीतबध्द केलेल्या मंगलाचरणाने कार्यक्रम सुरू झाला. त्यानंतर ''तिन्हिसांजा सखे मिळाल्या'', ''जीवलगा कधी रे येशील तू'', ही वाट दूर जाते'', ''सांग तू माझा होशील का'' आणि हिंदीतील - ''अब तो है तुमसे हर खुशी अपनी'', ''पिया तोसे नैना लागे रे'', ''दिलका भँवर करे पुकार'' इत्यादी गाणी सुरेख रित्या




रसिकांसमोर सादर केली. शेवटी सर्व श्रोत्यांच्या सहभागाने अभी ना जाओ छोडकर ह्या गाण्याने सुरेल मैफिलीची सांगता झाली .

या कार्यक्रमासाठी बँक ऑफ महाराष्ट्र निवृत्त कर्मचारी संघटनेच्या निवृत्त महिला सदस्यांची लक्षणीय उपस्थिती होती.

बँक ऑफ महाराष्ट्र निवृत्त संघटनेच्या उपाध्यक्षा सानिका खोपकर यांनी प्रास्ताविक भाषण केले. मनीषा साने आणि वीणा इतराज यांनी प्रसिद्ध गायिका डॉ मृदुला दाढे यांचे शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन स्वागत आणि सत्कार केला. त्यानंतर ज्योती गोळे यांनी डॉ. मृदुला दाढे यांचा परिचय करून दिला. लता राव यांनी कार्यक्रमाचा आभार प्रदर्शनाने समारोप केला.

# प्रतीक्षा संपली, ''देऊळ बंद २'' येतोय २१ मे २०२६ रोजी

## ''देऊळ बंद २'' आता परीक्षा देवाची - प्रविण तरडे

**ज्योतिर्मय साहित्य**

२०१५ साली प्रदर्शित झालेल्या ''देऊळ बंद'' चित्रपटाला प्रेक्षकांचा अभूतपूर्व प्रतिसाद मिळाला. अध्यात्म आणि विज्ञान यांची सांगड घालणारा, किंबहून विज्ञानाचा आत्मा हा अध्यात्म आहे हे अधोरेखित करणाऱ्या तसेच श्री स्वामी समर्थ महाराज आणि वैज्ञानिक यांच्या भोवती फिरणाऱ्या कथेने प्रेक्षकांच्या मनात एक वेगळी जागा निर्माण केली त्यामुळे आजही ''देऊळ बंद'' आवर्जून बघितला जातो. ''देऊळ बंद''चा अजून एक भाग




यावा अशी इच्छा अनेक प्रेक्षकांनी व्यक्त केली होती आणि या इच्छेचा मान राखत लेखक, दिग्दर्शक प्रविण विठ्ठल तरडे यांनी ''देऊळ बंद २'' ची घोषणा केली होती. आज वटवृक्ष एंटरटेनमेंट निर्मित ''देऊळ बंद २'' चे डिजिटल पोस्टर समाज माध्यमांवर (सोशल मीडियावर) प्रदर्शित करण्यात आले आणि चित्रपट २१ मे २०२६ रोजी जगभरात प्रदर्शित होणार असल्याचे जाहीर झाले.

लेखक, दिग्दर्शक आणि अभिनेते प्रविण विठ्ठल तरडे म्हणजे मराठी चित्रपटसृष्टीत वाजणारं खणखणीत नाणं आहे. त्यांनी लेखन आणि दिग्दर्शित केलेले देऊळ बंद, मुळशी पॅटर्न, सरसेनापती हंबीरराव, धर्मवीर, धर्मवीर २ या पाचही चित्रपटांना प्रेक्षकांनी अक्षरशः डोक्यावर घेतले त्यामुळे या सर्व चित्रपटांनी बॉक्स ऑफिसवर दमदार कामगिरी करत अनेक रेकॉर्ड ब्रेक केले आणि ''देऊळ बंद २'' हा त्यांचा सहावा चित्रपट रसिकांच्या पसंतीस उतरेल यात काही शंकाच नाही व त्याचीच एक झलक डिजिटल पोस्टर मध्ये दिसून येते आहे. ''आता परीक्षा देवाची '' असे उपशीर्षक असल्याने भक्तांसाठी देवाला कोणती परीक्षा द्यावी लागणार? याची उत्सुकता प्रेक्षकांना लागून राहिली आहे तसेच कोणते कलाकार कुठल्या भूमिकेत असणार आहेत? हे गुलदस्तात असल्याने ते जाणण्यासाठी रसिकांना अजून थोडी प्रतीक्षा करावी लागणार आहे.

२१ मे २०२६ रोजी प्रदर्शित होणाऱ्या वटवृक्ष एंटरटेनमेंट निर्मित ''देऊळ बंद २'' चे लेखन आणि दिग्दर्शन प्रविण विठ्ठल तरडे यांनी केले असून निर्मिती कैलाश वाणी, जयश्री कैलाश वाणी, कैवल्य वाणी आणि जुईली वाणी सूर्यवंशी यांनी केली आहे.

# ज्येष्ठ गायक अजित कडकडे यांना 'संगीत रत्न जीवन गौरव पुरस्कार'

**ज्योतिर्मय साहित्य**

मराठी इंडी संगीत क्षेत्राला समर्पित असलेला मराठी इंडी म्युझिक अवॉर्ड्स (मिमा) २०२६ हा भव्य सोहळा नुकताच उत्साहात आणि दिमाखात पार पडला. महाराष्ट्र आर्ट्स अँड कल्चर फाऊंडेशन यांच्या वतीने आयोजिलेल्या या सोहळ्याला स्वातंत्र्यवीर सावरकर सभागृहाचे अध्यक्ष रणजीत सावरकर, मंजिरी मराठे, प्रियांका बर्वे, मंदार चोळकर, सावनी रविंद्र, कार्तिकी गायकवाड, अविनाश विश्वजीत यांच्यासह संगीत क्षेत्रातील अनेक मान्यवर उपस्थित होते.

गेल्या काही वर्षांत मराठी इंडी संगीताने स्वतःची एक ठळक ओळख निर्माण केली आहे. चित्रपटांच्या चौकटीबाहेर पडत, स्वतंत्रपणे संगीतनिर्मिती करणाऱ्या कलाकारांच्या या नव्या लाटेला 'मिमा'सारख्या व्यासपीठामुळे योग्य ओळख आणि प्रोत्साहन मिळत असल्याचे या सोहळ्यात अधोरेखित झाले. गायक, संगीतकार, वादक, गीतकार तसेच तांत्रिक क्षेत्रातील कलावंतांचा सन्मान करून इंडी संगीताच्या सर्वांगीण प्रवासाचा गौरव करण्यात आला.

या सोहळ्यात शास्त्रीय संगीत आणि भजनासाठी प्रसिद्ध असणारे ज्येष्ठ गायक अजित कडकडे यांना 'संगीत रत्न जीवन गौरव पुरस्कार' प्रदान करण्यात आला. गीतकार गुरु ठाकूर आणि गायिका बेला शेंडे यांना 'मराठी इंडी म्युझिक आयकॉन' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. बासरीवादनातील उत्कृष्टतेसाठी अमर ओक यांना 'एक्सलेन्स इन म्युझिक अवॉर्ड', तर तांत्रिक क्षेत्रातील योगदानासाठी प्रमोद चांदोरकर यांना 'टेक्निकल एक्सलेन्स इन म्युझिक अवॉर्ड' देण्यात आला. 'सोबतीचा करार' या कार्यक्रमाला 'आयकॉनिक म्युझिक शो'चा मान मिळाला, तर अवधूत गुप्ते यांच्या 'आई' या अल्बमला 'आयकॉनिक म्युझिक अल्बम' म्हणून गौरविण्यात आले.




विशेष कामगिरीची दखल घेत आकाश देशमुख (टेंभुर्णी) यांना 'विशेष दिव्यांग कलाकार पुरस्कार' प्रदान करण्यात आला, तर परदेशात मराठी संस्कृतीचा ठसा उमटवणाऱ्या व्ही. रमेश (सौदी अरब) यांना 'प्रवासी मराठी कलाकार पुरस्कार' देऊन सन्मानित करण्यात आले.

या उपक्रमाबाबत आयोजक अजय नाईक म्हणाले, आजचा 'मिमा' सोहळा म्हणजे केवळ पुरस्कार वितरण नाही, तर मराठी इंडी संगीताच्या वाढत्या सामर्थ्याचा उत्सव आहे. स्वतःच्या बळावर उभं राहिलेलं हे संगीत आता केवळ पर्याय राहिलेलं नाही, तर मुख्य प्रवाहात आपली जागा निर्माण करत आहे. आमचा उद्देश केवळ पुरस्कार देण्यापुरता मर्यादित नाही, तर या कलाकारांना दीर्घकालीन व्यासपीठ, योग्य ओळख आणि उद्योगाशी जोडणं हा आहे. मिमाच्या माध्यमातून मराठी इंडी संगीताला जागतिक स्तरावर पोहोचवण्याचा आमचा प्रयत्न पुढेही सुरू राहील.''

मिमा २०२६मुळे मराठी इंडी संगीताला नवा आत्मविश्वास आणि व्यापक व्यासपीठ मिळाल्याची भावना यावेळी उपस्थित कलाकार आणि रसिकांमध्ये पाहायला मिळाली.



## सकल किष्किंधा की तारक : गुणमण्डित 'तारा'

**लेखिका- डॉ. मीना श्रीवास्तव**

प्रात:स्मरण

"अहिल्या द्रौपदी सीता तारा मंदोदरी तथा ।
पंचकन्या ना स्मरेन्नित्यं महापातकनाशनम् ।।"

इस श्लोक के अनुसार अहल्या, द्रौपदी, सीता, तारा, मंदोदरी इन पांचों का (पंचकं) ना यानि पुरुष ने (ना-अर्थात पुरुष इसका प्रथमा एकवचन) नित्य स्मरण करना चाहिए| ऐसा करने से महापातक का नाश होता है| अबतक हमने रामायण में वर्णित अहल्या और सीता, इन दो पंचकन्याओं के बारे में जाना | आइये आज हम रामायण की चौथी पंचकन्या 'तारा' के बारे में जानेंगे|

वाल्मिकी रामायण के किष्किंधा कांड में तारा नामक सशक्त स्त्री व्यक्तिरेखा का परिचय महा पराक्रमी किष्किंधा नरेश बाली की महारानी के रूप में होता है | तारा के जन्म की कथा समुद्रमंथन से जुडी है | समुद्रमंथन के समय दो पराक्रमी वानर, बाली और सुषेण, देवताओं की सहायता कर रहे थे | समुद्रमंथन से प्राप्त १४ रत्नों में एक अनुपम सौंदर्यवती अप्सरा तारा भी थी | उसके समुद्र से बाहर निकलते ही बाली आणि सुषेण, दोनों ही उसकी सुंदरता पर मोहित हुए और उन दोनों को ही उससे विवाह करने की इच्छा हुई| बाली तारा की दाहिनी तरफ खड़ा था और सुषेण उसके बाईं तरफ! उस समय वहाँ भगवान विष्णु उपस्थित थे | उन्होंने निर्णय लिया कि, कन्या की दाहिनी तरफ जो होगा, वह तारा का पति (अर्थात बाली) और उसकी बाईं तरफ जो होगा, वह उसका पिता (अर्थात सुषेण) होगा | इस निर्णय के अनुसार सुषेण ने तारा का कन्यादान किया| इसलिए उसे सुषेण की अयोनिज कन्या माना जाता है| वानर राज बाली ने तारा का पाणिग्रहण किया और तारा उसकी पटरानी और किष्किंधा की महारानी बनी |

तत्कालीन सामाजिक परिस्थिति के अधीन रहते हुए भी वह केवल बाली की पटरानी ही नहीं बल्कि, स्वतंत्र अस्तित्व की धनी तेजस्वी स्त्री है | वह अत्यंत बुद्धिमती, राजनीति में निपुण, दूरदर्शिता से परिपूर्ण एवं साहसी है | हमारी इस पंचकन्या को स्वतंत्र विचारधारा और संपूर्ण आत्मभान प्राप्त है, इसलिए वह आत्मप्रकाशित तेजस्वी तारा है! उसकी व्यक्तिरेखा में हमें बारम्बार इन गुणों का प्रत्यय आता है| तारा को जानना हो तो हमें किष्किंधा कांड की प्रमुख घटनाओं का स्मरण करना होगा| बाली और सुग्रीव ये दोनों भाई एक दूसरे से बहुत प्रेम करते हैं | बाली किष्किंधा का सम्राट तो सुग्रीव युवराज है | बाली इतना बलवान है कि, खुद को अजेय मानने वाले बलशाली रावण को भी वह पराजित करता है | प्रसंगवश एक बार बाली मायावी नामक राक्षस के साथ एक गुफा में युद्ध करने जाता है| गुफा के बाहर बहकर आती रक्त की धारा देख गुफा के बाहर खड़ा सुग्रीव गलती से यह मानकर चलता है कि बाली मृत हो चुका है | मायावी भाग न जाये इसलिए वह विशाल चट्टान द्वारा गुफा का द्वार बंद करता है एवं स्वयं किष्किंधा का राजा बनता है क्रमश:.......

## ओळख साहित्यिकांची



### ॲड. प्रा. कौशिक मनोहर हरणे

मी ॲड. प्रा. कौशिक म. हरणे, पुणे जिल्ह्यातील तळेगाव दाभाडे येथील NMIET महाविद्यालयात एम.बी.ए. विभागात प्राध्यापक म्हणून कार्यरत असून माझे शिक्षण बी.सी.ए (BCA), एम.बी.ए. (MBA), एल.एल.बी (LLB), आणि एल.एल.एम (LLM) या शाखांमध्ये पूर्ण झाले आहे. मला लेखन आणि कविता करण्याचा विशेष छंद आहे. शब्दांच्या माध्यमातून विचार मांडणे, भावना व्यक्त करणे आणि समाजातील विविध विषयांवर चिंतन करणे मला फार आवडते.

"शिक्षक कभी साधारण नहीं होता, प्रलय और निर्माण उसके गोद में पलते हैं" या आचार्य चाणक्य यांच्या विचारांनी प्रभावित होऊन राष्ट्रनिर्माणाच्या कार्यात आपलाही खारीचा वाटा असावा, या उद्देशाने मी शिक्षण क्षेत्राची निवड केली. 'राष्ट्रनिर्माण हे व्यक्तिनिर्माणातूनच घडते' आणि त्यामुळेच विद्यार्थ्यांच्या केवळ बौद्धिक विकासावर भर देणे पुरेसे नसून, त्यांच्या नैतिक आणि मूल्याधिष्ठित विकासालाही तितकेच महत्त्व आहे. विद्यार्थ्यांमध्ये प्रामाणिकपणा, जबाबदारी, शिस्त आणि सामाजिक बांधिलकी यांसारखी मूल्ये कशी प्रभावीपणे रुजवता येतील, यासाठी मी सातत्याने प्रयत्नशील असतो. अध्यापन करताना केवळ अभ्यासक्रम शिकवण्यापेक्षा जीवनमूल्ये आणि व्यवहारज्ञान यांचा समन्वय साधण्यावर माझा विशेष भर असतो. श्रीराम, श्रीकृष्णाच्या या राष्ट्रात आपण बघतो की नैतिकतेचा कसा दिवसेंदिवस ऱ्हास होत चालला आहे, त्यामुळेच आजच्या युगातील विद्यार्थ्यांनी केवळ ज्ञानसंपन्नच नव्हे तर मूल्यसंपन्न असणेही तितकेच आवश्यक आहे. एक शिक्षक म्हणून माझी भूमिका केवळ ज्ञान देण्यापुरती मर्यादित नसून, विद्यार्थ्यांना एक सक्षम, सजग आणि संवेदनशील नागरिक म्हणून घडविण्याची सुद्धा आहे. म्हणूनच या भूमिकेतून कार्य करतांना मी विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासावर, त्यांच्या आत्मविश्वास वृद्धीवर तसेच नेतृत्वगुणांच्या विकासावर विशेष लक्ष केंद्रित करतो.

शिक्षण हे केवळ पदवी मिळविण्याचे आणि पैसे कमविण्याचे साधन नसून, ते आयुष्य घडविण्याचे प्रभावी माध्यम आहे, असा माझा ठाम विश्वास आहे.

या सर्व उद्दिष्टांच्या पूर्ततेसाठी मी सातत्याने स्वतःला अद्ययावत ठेवण्याचा प्रयत्न करतो. एक शिक्षक म्हणून विद्यार्थ्यांच्या जीवनात सकारात्मक बदल घडवून आणणे हेच माझे अंतिम ध्येय आहे. राष्ट्रनिर्माणाच्या या पवित्र यज्ञात माझ्याकडूनही छोटीशी अहुती पडावी आणि त्या माध्यमातून समाजात सकारात्मक परिवर्तन घडावे, हीच माझी मनापासूनची व प्रामाणिक इच्छा आहे.

ज्योतिर्मय

Mutual Fund Online
Sahi hai.....
म्युच्युअल फंड ऑनलाईन
विनोद शिराळकर 9325383999


### मधाचे पोळे जणू म्युच्युअल फंड

*मित्रांनो "मधाचे पोळे" आणि "म्युच्युअल फंड" यांच्यात एक चमत्कारिक संबंध आहे . एक अतिशय रंजक साम्य आहे.*
*निसर्गाचा धडा: मधमाश्या आणि गुंतवणूक*
*मधमाशांचे पोळे हे एखाद्या चांगल्या प्रकारे व्यवस्थापित केलेल्या म्युच्युअल फंडासारखे असते.*
*एकत्रीकरण (पूलिंग): एक मधमाशी खूप कमी मध गोळा करू शकते, परंतु जेव्हा संपूर्ण कॉलनी एकत्र येते, तेव्हा त्यातून मधाचा मोठा साठा तयार होतो. म्युच्युअल फंडातही अनेक गुंतवणूकदार आपले थोडे थोडे पैसे एकत्र करतात, ज्यातून एक मोठा निधी (कॉरपस) तयार होतो.*
*वैविध्य (दिव्हर्सिफिकेशन): मधमाश्या वेगवेगळ्या फुलांवर फिरतात. जर एका प्रकारचे फूल उपलब्ध नसेल, तर त्या दुसऱ्या फुलाकडे जातात. म्युच्युअल फंड देखील तुमचे पैसे वेगवेगळ्या कंपन्यांमध्ये गुंतवतो, जेणेकरून जोखीम कमी होते.*
*सातत्य (SIP): मधमाश्या दररोज थोडे थोडे मध गोळा करून साठा बनवतात. हे SIP (सिस्टिमॅटिक इन्व्हेस्टमेंट प्लॅन) सारखेच आहे, जिथे थोडी छोटी गुंतवणूक भविष्यात मोठी संपत्ती निर्माण करते.*
*मधमाशी कष्टाने मधे गोळा करते तसेच जसे गुंतवणूकदार पै पै जमा करून म्युच्युअल फंडामध्ये नीधी जमवतात.*
*दोघांनाही जे फळ मिळते ते मधुर असते.*
*निसर्ग आणि निसर्गाचे निरनीराळे घटक नेहमीच आपल्याला काही तरी शिकवण देत असतात..*
*तुम्हीही मधमाशी सारखं कष्टाळू व्हा.म्युचुअल फंडात गुंतवणूक करा.*
▪ ▪ ▪




### एप्रिल कूल कूल

वाचक हो, आणि ज्योतिर्मयी रसीक हो.. तुम्हाला वाटेल एवढ्या गरमागरमीत 'कूल कूल' कसे.. म्हणूनच मी हे शिर्षक दिले. नाही तर सध्या अमेरिका, ईराण, इस्रायलच्या युद्धाची धग व उन्हाळा याचे चटके बसत आहेत.. म्हणूनच
मनाला थोडा गारवा व शांततेसाठी हा "एप्रिल फूलच्या "ऐ वजी कूल आहे.. तर मुद्दा असा आहे. "मार्च एन्ड" झाला.. तेव्हा माझ्या एका मित्राने ॲपवर एक कविता पाठविली. तिच नावच आहे 'मार्च एन्ड स्पेशल'.. म्हणून खास दै.ज्योतिर्मयी वाचक रसिकासाठी त्या कवितेचा थोडक्यात - गद्यात सार वाचा आणि व कूल कूल व्हा. शांत व्हा. पटत का..बघा..
मार्च अखेर म्हणजे "आर्थिक हिशोब "कशाला??बाऊ करायचा कशाला?एवढे वर्ष तर जातातच ना. जीवनात त्या ईश्वराने भरभरून दिल्या वर "थोड नाही तर नाही "मित्र नातलगांचे अलोट प्रेम दिले तर शत्रूच्या एखाद्या वाक्याचा "हिशोब" ठेऊ नका
तुमचे दिवस प्रकाशमान, आनंदी आहे तर मग अंधार व ऊदासीपणाचा हिशोब कशाला?
मधुर आठवणी क्षण आणि अनेक फुलांचे बुके मिळवले तर दुःखद घटना, गोष्टी व काट्याचा हिशोब कशाला? काय बरोबर ना? बघा थोडं कूल वाटतं ना चंद्रमाच्या प्रकाशासारख.. तर थोड्या डागाचा थोड्या भेटण्या न भेटण्याचा, वाईटपणाचा, न बोलण्याचा, न काल घेण्याचा, नाही एखाद्या वेळेस अभिनंदनाचा आग्रह न ठेवता.. सर्व सोडून द्यावे..जे झाले ते गंगेला मिळाले असं समजावं, त्याचा हिशोब कशाला??
तर कसे वाटले हे"आपले एप्रिल कूल"
आनंदी राहा.. स्वस्थ राहा.. मस्त राहा
गुड डे. टेक ईट ईझी..

*साहित्यिक मित्रांनो,*
*आता लिहा बिनधास्त कारण आता तुमच्या साहित्याला प्रकाशित करण्यासाठी आले आहे एक भव्य व्यासपीठ*
ज्योतिर्मय
साहित्याचे विद्यापीठ
*"ज्योतिर्मय" साहित्याचे विद्यापीठ.*
*साहित्यावरील प्रत्येक घटना, कथा, कविता, लेख, परीक्षण, पुरस्कार, संमेलन प्रत्येकाची नोंद आम्ही घेणार, मग विचार कसला करता!*
*हो जाओ शुरु....*
*या व्यासपीठावर तुमचे सर्वांचे स्वागत आहे.*
*- संजय व्यापारी, संपादक 7743918559*
*ज्योतिर्मय-साहित्याचे विद्यापीठ*


ऑनलाईन औषधोपचार

आता सर्वकाही झाले आहे ऑनलाईन मग आजारपणात पण घरबसल्या औषधोपचार घ्या, कुठेही जाण्याची गरज नाही, वेळ व पैसा वाचवा 100 % खात्रीशीर इलाज, गुप्तरोग, शारीरिक थकवा, बऱ्याच गोष्टी कोणालाही सांगण्यास लाज वाटते अशा वेळेस फक्त फोनवर तुम्ही तुमचा आजार सांगू शकता व त्यावर आयुर्वेदिक पद्धतीने हमाखास उपाय केला जाईल, पोस्टाने औषधं पाठविल्या जातील, प्रसिद्ध आयुर्वेदाचार्य डॉ. शेख ए एच, 37 वर्षांचा अनुभव, 200 पेक्षा अधिक पुरस्कार प्राप्त, 2 लाखांपेक्षा अधिक विविध लैंगिक समस्यग्रस्त रुग्णांवर यशस्वी उपचार, आतापर्यंत ५ ऑनररी डॉक्टरेटच्या पदव्या देऊन विविध संस्थांनी त्यांना सन्मानित केलेले आहे. त्यांच्या या कार्याची नोंद लंडन बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड, ओयासिक बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड, एशियन बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड, हुज-हू-इन एशिया रेकॉर्ड्स् मध्ये विक्रमी नोंद झालेली आहे. सेक्स विषयक कोणताही प्रॉब्लेम असो फक्त एकदा फोन करा व मार्गदर्शन घ्या. व तुमचे प्रश्न सोडवा.
Dr Shaikh A H - 98606 99906

# मास्टर अमीरचंद स्वातंत्र्य लढ्यातील दुर्लक्षित क्रांतिकारक

**ज्योतिर्मय साहित्य**

मास्टर अमीरचंद हे स्वातंत्र्यलढ्यातील एक महत्त्वाचे, पण अनेकदा दुर्लक्षित राहिलेले क्रांतिकारक-शिक्षक होते. दिल्लीतील स्वदेशी चळवळ, गदर पक्षाशी संपर्क, आणि लॉर्ड हार्डिंगवरील हल्ल्याशी संबंधित कटात त्यांची भूमिका लक्षात घेतली तर त्यांचे योगदान केवळ फाशी झालेल्या शहीदापुरते मर्यादित राहत नाही.मास्टर अमीरचंद यांचा जन्म १८६९ मध्ये दिल्लीत एका वैश्य कुटुंबात झाला. ते शिक्षक होते आणि सामाजिक सुधारणा, शिक्षणप्रसार, विधवाविवाहाचे समर्थन, तसेच मद्यत्याग या मुद्द्यांवर त्यांची ठाम भूमिका होती. स्वातंत्र्यलढ्यात त्यांचा प्रवेश मवाळ काँग्रेसवादी भूमिकेतून झाला, पण बंगाल फाळणीच्या पार्श्वभूमीवर सुरू झालेल्या स्वदेशी चळवळीत त्यांनी दिल्लीत स्वदेशी दुकान काढले, देशभक्तांची चित्रे आणि क्रांतिकारी साहित्य विकले, तसेच स्वदेशी प्रदर्शने आयोजित केली. यामुळे ते केवळ विचारवंत किंवा शिक्षक न राहता राष्ट्रवादी जनजागरणाचे सक्रिय कार्यकर्ते बनले.

लाला हरदयाळ यांच्या संपर्कातून ते क्रांतिकारी विचारांकडे वळले आणि गदर पक्षाशी जोडले गेले. अलिपूर बाँब केस नंतर लाला हरदयाळ परत इंग्लंड मध्ये गेले. त्यांनी जाताना आपल्या कार्याची सूत्रे आपले सहाध्यायी लाला हनुमंत सहाय व मास्टर अमीरचंद यांच्या हाती दिल्लीला सोपविली.मास्टर अमीरचंद हे प्रथम केंब्रिज मिशन हायस्कूल मध्ये शिक्षक होते.ते अतिशय सुस्वभावी,चारित्र्यशील आणि इंग्रजीचे उत्तम लेखक होते.स्वभाव विनोदी व चेहरा कुरूप असल्यामुळे ते स्वतःला बंदर मास्तर म्हणवीत.ते विद्यार्थी वर्गात अतिशय प्रिय होते.क्रांतिपक्षात तरुणांची निवड करून स्वातंत्र्य लढ्यात भरती करण्याचे एक साधन म्हणून हनुमंत सहाय यांनी दिल्ली येथील आपल्या घरात राष्ट्रीय विद्यालय काढले.तेथे मास्टर अमीरचंद,गणेशीलाल खस्ता,अवध बिहारी हे अध्यापनाचे काम करीत. लवकरच ही शाळा अत्यंत लोकप्रिय झाल्यावर तिला जोडून अमीरचंदानी राष्ट्रीय वाचनालय काढले व तरुण क्रांतिकारकांना साहित्याची गोडी लावण्याचा प्रयत्न चालविला.२० वर्षाहून लहान असलेले अवध बिहारी अमरचंद यांचे शिष्य होते. लहानपणीच वडील निवर्तल्यामुळे अमीरचंदानी स्वतःच्या घरीच त्यांना वाढवून शिक्षण दिले. अवध बिहारी हे बी.ए.,बी.टी.,होते आणि त्यांना बी.टी., परीक्षेत सुवर्ण पदक मिळाले होते.पुढे रासबिहारी बोस यांच्या नेतृत्वाखाली उत्तर भारतातील क्रांतिकारी हालचालींमध्ये त्यांनी महत्त्वाची संघटनात्मक भूमिका बजावली. रासबिहारी बोस यांनी लाहोर येथे १९११ साली सर्व क्रांतिकारकांची एकत्रित बैठक घेऊन त्यांची एक मध्यवर्ती कार्यकारिणी प्रस्थापित केली. या समितीच्या वतीने मास्टर अमीरचंद,बसंतकुमार बिस्वास,भाई बालमुकुंद,हनुमंत सहाय,अवध बिहारी,बलराज इत्यादी अनेक कार्यकर्ते रासबिहारी बोस यांच्या नेतृत्वाखाली कार्य करू लागले.अमेरिकेत त्यावेळी गदरचे आयोजन सुरू होते. त्यामुळे या कार्यकारीणीनेही सामान्य जनतेबरोबरच सैन्यात विद्रोहाचा प्रारंभ केला.लिबर्टी नावाची पत्रके त्यावेळी सैन्यात वाटली जात.

डेहराडून, कसौली, अम्बाळ येथील व पंजाब ते उत्तर प्रदेशाच्या अनेक सेनानिवेशातून ही पत्रके वाटण्यात येत होती. विद्यार्थी व सामान्य जनता यांच्यातही या पत्रकांचा प्रसार जोरात सुरू होता. कलकत्ता ते लाहोरपर्यंत पत्रके व बॉम्बस यांच्यात इतकी एकसूत्रता होती की, ब्रिटिश शासनही त्याविषयी आश्चर्यचकीत झाले होते. मास्टर अमीरचंद यांनी एका पत्रकात लिहिले होते कि, ''देशाचे शत्रू मग कोणत्याही जातीचे, पंथाचे व वर्णाचे असोत त्यांचा नाश केलाच पाहिजे अशी गीता, वेद व कुराण यांची शिकवण आहे.'' त्याकाळात मास्टर अमीरचंद पत्रके लिहिण्यात अग्रेसर होते. थोड्याच दिवसात मास्टर अमीरचंद व त्यांचे सहकारी यांच्या प्रयत्नांमुळे पंजाबचे वातावरण इतके स्फोटक बनले कि, १९१२ मध्ये मायकेल ओडवायर पंजाबचा गव्हर्नर म्हणून नियुक्त



करताना ''पंजाबमध्ये एक ज्वालामुखी धुमसत असून त्याचा केव्हाही स्फोट होण्याचा संभव आहे'' अशी स्पष्ट कल्पना ब्रिटिश सरकारकडून देण्यात आली होतो. मायकेल ओड्वायरने पंजाबची राज्यसूत्रे हातात घेताच या ज्वालामुखीचा पहिलाच स्फोट दिल्लीत झाला.

१२ डिसेंबर १९१२ रोजी सम्राट पंचम जॉर्ज यांनी दिल्लीत वैभवशाली दरबारात भारताची राजधानी दिल्ली झाल्याचे घोषित केले. त्यानंतर व्हॉइसरॉय लॉर्ड हार्डिज यांचा राजप्रतिनिधी या नात्याने दिल्लीत प्रवेश व्हावयाचा म्हणून तो समारंभपूर्वक व्हावा असे ठरले. राजसत्तेच्या वैभवाचे, दरा-याचे व थाटाचे प्रदर्शन व्हावे म्हणून २३ डिसेंबर १९१३ रोजी व्हाइसरॉय लॉर्ड हार्डिंज यांची एक भव्य मिरवणूक निघाली. रस्ता माणसांनी फुलून गेला होता. येता येता ही मिरवणूक दिल्लीच्या इतिहास प्रसिद्ध चांदणी चौकात आली. तेथे एकच जनसंमर्द उसळला. लॉर्ड हार्डिंग- साभिप्राय व सस्मित कटाक्षाने लोकांच्या अभिवादनाचा हत्तीवर बसून स्वीकार करीत होते. मास्टर अमीरचंद यांच्या नियोजनाप्रमाणे आणि रासबिहारी बोस यांच्या नेतृत्वाखाली बसंतकुमार बिस्वास यांनी स्त्रीवेश धारण करून व्हाईसरॉयच्या महिलांसाठी राखीव असलेल्या मार्गावर एका छतावरून लॉर्ड हार्डिज ज्या हत्तीवर बसून अभिवादन स्वीकारात होता त्या हत्तीवरील लॉर्ड हार्डिंज याच्यावर घरगुती बॉम्ब भिरकावला आणि गर्दीत घुसुन पळ काढला. बॉम्बचा स्फोट झाला आणि गगनमंडळ धुराने व्याप्त झाले. ध्यानी-मनी-स्वप्नीही नाही असा तो बॉम्बचा प्रचंड धडधडाट ऐकताच मिरवणूक उधळली गेली. लोक सैरभर होऊन पळत सुटले. या बॉम्ब हल्ल्यात लॉर्ड हार्डिज जखमी झाला व वाचला पण त्यांचा अनुचर ठार झाला. ब्रिटिश सत्तेला रूधिर लांछन लागले.

पोलिसांचा बंदोबस्त, लष्करी फौजेची तयारी, गुप्तचरांचा सुळसुळाट, सेनापतीची सज्जता हे सर्व दिल्लीच्या मुख्य राजपथावर असूनही बॉम्बचा स्फोट झाल्यामुळे ब्रिटिश शासनाला नामुष्की स्वीकारावी लागली. झालेल्या अपमानास्पद घटनेमुळे आणि व्हॉइसरॉय थोडक्यात बचावल्याने ब्रिटिश सीआयडीने झालेल्या कृत्याचा छडा लावण्यासाठी भारत देशभर शोध मोहिम चालू केली. पण बाँब फेकण्याची कल्पना प्रत्यक्षात आणणारे स्वातंत्यसैनिक हे सावध होते. त्यांनी ब्रिटिश पोलिसांच्या हातावर तुरी देऊन त्यांना काडीचाही पत्ता लागू दिला नाही. याउलट १३ मे १९१३ रोजी लाहोरच्या लॉरेन्स गार्डनमध्ये पंजाबच्या सर्व सिव्हिलीयन सेवकांचे जे संमेलन होते त्याठिकाणी बॉम्बस्फोट मास्टर अमीरचंद यांनी घडवून आणला. या बॉम्बहल्ल्यात एका हिंदी चपराशाचा बळी घेतला. याचवर्षी मैमनासिंग, भदेश्वर व मौलवी बाजार याठिकाणी क्रांतीकारकांनी बाँब उडविण्याचे प्रयत्न केले. ब्रिटिश शासन प्रचंड चिडले. सगळीकडे धरपकड चालू झाली. दिल्ली बाँबस्फोटाला एक वर्ष लोटून गेले तरी बॉम्ब कटाचा एखादाही सभासद सरकारच्या हाती लागेना. इतक्यात पुनश्च आसामातील सिलहट जिल्ह्यात मौलवी बाजार येथील डी.सी.च्या बगीचात बाँब ठेऊन त्यांचा जीव घेण्याचा प्रयत्न करण्यात आला. यासर्व कटाचा सुत्रधार




रासबिहारी बोस होय हे सरकार जाणून असल्याने एकाएकी सिलहट मॅजिस्ट्रेटकडून वॉरंट मिळवून कलकत्ता येथील रासबिहारीच्या राजाबाजार येथील निवास स्थानावर ब्रिटिश पोलिसांनी हल्ला केला. पण रासबिहारी बोस हे केंव्हाच दिल्लीला पसार झाले होते.

रासबिहारी सापडत नाहीत हे लक्षात आल्यावर संशयीत क्रांतीकारीकांच्या कलकत्ता येथील अप्पर सर्क्युलर रोड याठिकाणच्या घरावर छापा टाकीत मास्टर अमीरचंदा संबधी जेवढा पत्रव्यवहार होता तेवढा पोलिसांनी तपासून पाहिला त्यात मास्टर अमीरचंद यांनी अवध बिहारी यांना लिहिलेले एक पत्र त्यांना सापडले. ताबडतोब अवध बिहारी यांना अटक करून पत्रात उल्लेख असलेले एम.एस. कोण असे विचारले असता त्यांनी लाहोरचे दीनानाथ नावाचे गृहस्य असे बाकी काही नं सांगता सांगितले. त्याच दिवशी संध्याकाळी लाहोरात जेवढे दीनानाथ नावाचे गृहस्थ होते त्यांच्या घरावर पहारे बसविण्यात आले व सर्व चार दीनानाथ नावाच्या व्यक्तीना अटक करण्यात आली. यातील एक दीनानाथ व्यक्ती रडायला लागला हे बघून बाकीच्या तीन दीनानाथ व्यक्ती सोडून त्याला खडसावले असता त्याने पोलिसांना सांगितले की मी मास्टर अमीरचंद यांचा अनुचर होतो आणि दिल्ली व लाहोर येथे उडालेल्या बॉबसंबंधीची सर्व माहिती त्याने पोलिसांना दिली. त्याच्या जबानीवरुन मास्टर अमीरचंद, अवध बिहारी, बसंत कुमार बिस्वास, भाई बालमुकुंद, लाला हंसराजांचे चिरंजीव बलराज, हनुमंत सहाय, चरणदास वगैरे क्रांतिकारकांना अटक करण्यात आली.आतापर्यंत झालेल्या सर्व कटांची जबाबदारी रासबिहारी बोस परागंदा झाल्याने मास्टर अमीरचंद यांच्यावर टाकण्यात आली. अमीरचंद यांच्यावर सर्व पत्रके लिहिल्याचा आरोप होता. या पत्रकात एक वाक्य होते ते असे, आपण संख्येने इतके बलिष्ठ आहोत की ब्रिटिश पोलिसांकडून त्यांच्या तोफा हिसकावून घेऊ शकतो.

अवध बिहारी व मास्टर अमीरचंद यांची जीवश्चकंठश्च मैत्री होती. त्यांनी लिबर्टी पत्रके देशात व विशेषतः तरुणांना वाटल्या होत्या. त्या पत्रिका कलकत्याच्या राजबझार प्रेसमध्ये छापल्या होत्या. दीनानाथ फितुर झाल्यामुळे सर्वच कट सापडला. राजबझार संस्थेने जी पत्रके छापली,जो पत्रव्यवहार केला व जे बांबूचे साहित्य बॉम्बसाठी उपयोगात आणले त्यामुळे या केसचा सुगावा लागला. कारण तशीच पत्रके व तसेच बाँब दिल्ली व लाहोर येथे बॉम्ब स्फोटात वापरण्यात आले होते. मास्टर अमीरचंदानी व सर्वांनी हे सर्व आरोप नाकारले. मास्टर अमीरचंदाना दीनानाथच्या जबाबाने दोषी ठरवणे सोपे नव्हते कारण ते स्वतः इतके सच्चरित्र होते कि, सारी जनता प्रक्षुब्ध होऊन त्यांना निरपराध समजत होती. पण ध्यानीमनी नसताना मास्टर अमीरचंदानी ज्याला लहानाचा मोठा करून वाढविले तो दत्तक पुत्र सुलतानचंद त्यांच्याविरुद्ध फुटला आणि सर्व माहिती दिल्याने लोकांना जरब बसावी म्हणून दीनानाथ व सुलतानचंद यांच्या जबान्या यावर एकंदर आरोपी पैकी मास्टर अमीरचंद, अवध बिहारी बाळमुकुंद व बसंत कुमार बिस्वास यांना फाशीची शिक्षा आणि लाला हंसराजांचे चिरंजीव बलराज व हनुमंत सहाय यांना सात वर्ष काळेपाणी अशी शिक्षा ठोठावण्यात आली. फाशी जाणाऱ्या लोकांपैकी अमीरचंदांच्या अनुयायात मरणाला भिणारे कायर कोणीच नव्हते. ज्या धैर्याने भारताच्या स्वातंत्र्यासाठी आपण अवलंब केला आहे त्यात असे प्रसंग यायचेच असे सर्व जाणून होते. शिक्षा ऐकताच त्यांचे चेहरे तळपळू लागले. ८ मे १९१५ रोजी दिल्ली तुरूंगात क्रांतीकारक मास्टर अमीरचंद, अवध बिहारी आणि भाई बालमुकुंद यांना फाशी देण्यात आले. ११ मे १९१५ रोजी अंबाला सेंट्रल जेलमध्ये बसंत कुमार बिस्वास यांना फाशी देण्यात आले.

बंगाल फाळणीच्या काळात सुरू झालेल्या स्वदेशी चळवळीने मास्टर अमीरचंद यांच्या जीवनाला निर्णायक वळण दिले. त्यांना सामाजिक सुधारणांची तीव्र जाणीव होती. विधवाविवाहांना पाठींबा देणे, मद्यत्यागाचा प्रचार करणे आणि शिक्षणाचा प्रसार करणे ही त्यांची कार्यक्षेत्रे होतो. विशेषतः विधवांच्या हक्कांबद्दल त्यांची भूमिका पुरोगामी होती. हिंदू समाजातील विधवांना बहिष्कृत करण्याच्या प्रवृत्तीला त्यांनी उघड विरोध केला आणि स्त्रीचे आयुष्य सन्मानाने जगण्याचा हक्क अधोरेखित केला. ही सामाजिक संवेदनशीलता त्यांच्या राष्ट्रवादाशी जोडलेली होती. राष्ट्रनिर्मीती केवळ ब्रिटिशांपासून स्वातंत्र्य मिळवणे नव्हते, तर समाजाचा नैतिक आणि बौद्धिक उत्कर्ष घडवणेही महत्वाचे हे त्यांचे उद्दिष्ट होते.या सर्वांच्या फाशीमुळे भारताच्या स्वातंत्र्यलढ्याला भारतभर विशेषतः तरुण पिढीकडून बळ मिळाले.

# टेरेसवरील कवितांची अवीट मैफल....

**ज्योतिर्मय साहित्य**

शेजारील देशात युद्धाचे नगारे वाजत असताना, काही देश एकमेकांना नष्ट करण्याची भाषा आणि कृती करत असताना कवी मात्र माणुसकीच्या, मानवतेच्या, शांततेच्या कविता पेरतात आणि या जगाला पुन्हा मानवतेचा धर्म शिकवतात.

कविता समाज बदलू शकते, कविता जग बदलू शकते ह्या विचाराने कवी एकत्र येतात आणि शब्दांचे वाण लुटतात..

प्रत्येक महिन्याला शहरातील काही कवी आपल्यापैकीच कुण्या एका कवीच्या गच्चीवर जमतात आणि एकमेकांना कविता ऐकवतात. कवितेच्या ह्या बहारदार मैफलीत दोन-तीन तास कसे निघून जात कळतच नाही.

मार्च महिन्याची टेरेसवरील काव्य मैफल कवयित्री दिपाली कुलकर्णी ह्यांच्या टेरेस वर फुलझाडांच्या साथीने उत्तरोत्तर रंगत गेली. शहरातील कवी - कवयित्री ह्यांनी दर्जेदार स्वालिखित कविता सादर करून उपस्थितांची दाद मिळविली. यावेळी महाविद्यालयीन युवा कवींची उपस्थिती मोठ्या प्रमाणावर होती.

कुणी मनाचा ठाव घेणाऱ्या गझला सादर केल्या, तर कुणी भोवतालचे वास्तवचित्र कवितेतून रेखाटले, कुणी प्रेमावर व्यक्त झाले तर कुणी नात्यांच्या परिस्थितीवर बोलले. काही छंदोबद्ध तर काही मुक्त छंदातील कवितांनी मनाचा ठाव घेतला. जवळपास ३०-३५ कवींनी विविध विषयाच्या, आशयाच्या दर्जेदार कविता सादर केल्या. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून छ.संभाजीनगर आकाशवाणीचे मुख्य अधिकारी श्री सुजित बनसोडे उपस्थित होते. सूत्रसंचालन युवा कवी अर्जुन गायकवाड, अजय त्रिभुवन, सुशील सातपुते, महेश अचिंतलवार ह्यांनी केले. तर दीपाली कुलकर्णी ह्यांनी आभार व्यक्त केले. गिरीश जोशी ह्यांनी प्रास्ताविक केले.






नवोदितांना हक्काचे व्यासपीठ मिळावे, कवितेची चळवळ अखंड सुरू रहावी ह्या हेतूने हा कवींचा परिवार टेरेसवरील कविता उपक्रम मोठ्या उत्साहाने एक व्रत म्हणून चालवत आहे.

शहरातील प्रस्थापित तसेच नवोदित कवी ह्या चळवळीत आनंदाने सामील होत असतात.

गेल्या सात-आठ वर्षांपासून कवी गिरीश जोशी ह्यांच्या संकल्पनेवर आधारित टेरेसवरील कवितांची मैफल आता लोकप्रिय होऊ लागली आहे.

## काही निवडक रचना -

रिकामी होत आहे रोज घागर
कुणाचे दुःख मी आहे मनोहर
तुझे माझे किती नुकसान झाले
कमी पडतील मापे मोजले तर

**- मनोहरकाकडे**

आठवत नाही अता केव्हातरी आलो
आज मी ही खूप दिवसांनी घरी आलो
एकटीने भोगते आहेस तू सारे
मी तुझ्या दुःखामध्ये वाटेकरी आलो
देउनी जाईन मी काहीतरी नक्की
या जगामध्ये रित्या हाती जरी आलो

**- अजय त्रिभुवन**

भोंदूगिरीत अडकुन पडलेय गाव आता
झाला गुलाम आह तो भक्तिभाव आता
ज्याला कळले नाही भविष्य स्वतःचे
अंकशास्त्राने घेती भक्तांचा ठाव आता

**- कवी डॉ सुशिल सातपुते**

कागदोपत्रीच स्त्री-सबलीकरण होते,
मुख्य चौकातून मुलगी घाबरत जाते.

**- गिरीश जोशी**

वकालत करती लड़कियाँ
ज़रा मुँहफ़ट होती हैं!
जनाब ऐसी मुँहफ़ट लड़कियाँ
भला किसको भाती हैं?
ख़ुद-एतमाद कारी कारी चमकती आँखें,
करारी आवाज़
जब शब्दों को साझा करती हैं,
तो इनक़िलाब कर जाती हैं!
नूर साथ लिए चलती है
कमाल ख़ूबसूरत दिखती हैं
ये मुँहफ़ट लड़कियाँ!

**- भावना मोगल**

अव्यक्त भावनांचे ओझे मनात आहे
या थंड गारव्याच्या वणवा उरात आहे
ताटात वाढते ती तो घास अमृताचा
आईशिवाय गोडी कुठल्या करात आहे
बदनाम जाहलो मी इतक्यामुळेच केवळ
माझ्या दिव्यात आता माझीच वात आहे

तिच्या पापणकाठावरून
ओघळणाऱ्या मोत्याची
धास्ती होती काळजात?
नव्हतीच!
पण हा सलणारा शहारा
कायम देहावर...
म्हणून तर निसटत होता
शेल्याला शब्द दे
शहारा बोलू देत...
तुला पांघरून घ्यावं म्हणते!..

**-मनस्विनी मृणाल देशपांडे**

वसंत यायची उगाच वाट का बघायची?
ऋतू बघून का कधी फुले इथे फुलायची?
उन्हात चाललो तरी मनात ओल ठेवतो
म्हणून पावसावरी गझल मला सुचायची !

**- ऋषभ कुलकर्णी**

मी झाड तोडलं
मग झाडाचं
लाकूड केलं
लाकडाचा ब्रश केला
त्या ब्रशने मी
निसर्ग चित्र काढले
बघणारे सगळेच
माझं कौतुक केले
काही लेकरं म्हणाली
आम्हाला हि चित्र शिकवा
मी त्यांचे बोट धरुन
आधी त्यांना झाड लावायला सांगतो
आणि
माझी रक्ताळलेली बोटं
हिरवीगार होतात

**- सुनील उबाळे**

***

हे जरनल संपादक व प्रकाशक संजय व्यापारी यांनी विंग बी३, फ्लॅट नं.७०१, व्हिसलिंग पाम्स हौ.सो., मानकर चौक, कस्पटे वस्ती, वाकड, पिंपरी-चिंचवड, महाराष्ट्र ४११०५७ येथून प्रकाशित केले. (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद पुणे न्यायालयाच्या कक्षेत) E-mail-jyotirmaysahitya@gmail.com, Mob. 7743818559